**महाराष्ट्र राज्याचे क्रीडा धोरण, २०१२ क्रीडा पुरस्कार विजेते खेळाडू, कुस्तीगीर यांना सदनिका आरक्षणाबाबत.**

# महाराष्ट्र शासन
## शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
## शासन परिपत्रक क्रमांकः क्रीडाधो-३११३/प्र.क्र.३३/१३/क्रीयुसे-३

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक
मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२,
तारीख दिनांक : १८ मार्च, २०१३

**वाचा**

१) **शासन निर्णय क्रमांकः गृहनिर्माण व विशेष सहाय्य विभाग क्रमांक-एजीएन-११८४/(२३८८)/का-९, दिनांक १४ जुलै, १९८६**
२) **शासन निर्णय क्रमांकः नगर विकास विभाग क्रमांक-सदनिका-१० (२०११) /प्र.क.२/नाजकाधा-१, दिनांक ३० नोव्हेंबर, २०११**

**प्रस्तावना**

राज्याचे क्रीडा धोरण, २०१२ या धोरणामधील एक शिफारस क्रीडा पुरस्कार विजेते खेळाडू, कुस्तीगीर यांना द्यावयाच्या सवलतीबाबत आहे. त्यानुसार महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण, सिडको इत्यादी शासकीय प्रकल्पात केंद्र व राज्य शासनाचे क्रीडा पुरस्कार विजेते खेळाडू तसेच हिंद-केसरी, रुस्तमे-ए-हिंद, भारत केसरी, महान भारत केसरी किताब प्राप्त खेळाडूंना सदनिकांसाठी आरक्षण ठेवण्यात येईल. क्रीडा संचालनालयाच्या शिफारशीसह शासनाच्या नगर विकास विभागाकडे प्रस्ताव सादर करण्यात येतील अशी आहे.

## परिपत्रक

उपरोक्त (२) येथील शासन निर्णयानुसार उपरोक्त (१) येथील शासन निर्णय अधिक्रमित करण्यात आलेला आहे व उपरोक्त (२) येथील शासन निर्णयानुसार स्वेच्छाधिकार विविध प्रवर्गातील अर्जदारांना सदनिका वितरीत करण्याची नवीन कार्यपध्दती नमूद केलेली आहे. त्यानुसार पदम पुरस्कार प्राप्त किंवा ऑलिम्पिक, राष्ट्रकुल किंवा एशियन यापैकी किमान एका स्पर्धेत पदक प्राप्त केलेले खेळाडू यापुढे पात्र राहणार आहेत. त्यामुळे केंद्र व राज्य शासनाचे क्रीडा पुरस्कार विजेते यांना स्वेच्छाधिकारात यापुढे सदनिका वाटप करण्यात येणार नाही.

२. मात्र याच शासन निर्णयामधील परिच्छेद-"इ" नुसार सदर धोरणातील अटी/निकष शिथिल करण्याचे व विशेष बाब म्हणून सदनिका वितरण करण्याचे अधिकार मा. मुख्यमंत्री महोदयांना राहणार आहे. त्यामुळे राज्य क्रीडा धोरण, २०१२ मध्ये प्रस्तावनेत नमूद केलेले खेळाडू/कुस्तीगीर त्यानुसार मा. मुख्यमंत्री महोदयांकडे अर्ज करु शकतात.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१३०३१८१६१९१६५७२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Rajshekhar Chandrakant Patil

Digitally signed by Rajshekhar Chandrakant Patil
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=School Education & Sports Dept, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Rajshekhar Chandrakant Patil
Date: 2013.03.18 16:24:23 +05'30'

**रा.चं. पाटील**

उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रती,

१. मा. मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव,
२. मा. उप मुख्यमंत्र्यांचे सचिव,
३. अपर मुख्य सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई,
४. प्रधान सचिव, गृहनिर्माण व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई,
५. प्रधान सचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई,
६. आयुक्त, क्रीडा व युवकसेवा, पुणे.
७. सर्व उपसंचालक, क्रीडा व युवकसेवा (संचालनालयामार्फत)
८. सर्व जिल्हा क्रीडा अधिकारी (संचालनालयामार्फत)
९. ग्रंथपाल, विधीमंडळ ग्रंथालय, विधानभवन, मुंबई.
१०. मा. मंत्री (क्रीडा व युवक कल्याण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
११. मा. राज्यमंत्री (क्रीडा व युवक कल्याण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय,मुंबई
१२. निवड नस्ती (क्रीयुसे-१, क्रीयुसे-२ व क्रीयुसे-३)